**Deshonnati, Nagpur, Aug 31 2012**

# टीसीएस आयटी स्पर्धेत सेंटर पॉईंट अव्वल

*प्रतिनिधी / ३० ऑगस्ट*

**नागपूर :** शाळकरी मुलांना आयटी तंत्रज्ञान प्राप्त व्हावे म्हणून देशाच्या विभिन्न भागात आयटी स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्यानंतर नागपुरात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या 'टीसीएस आयटी क्विज-२०१२' मध्ये येथील सेंटर पॉईंट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून अव्वल स्थान प्राप्त केले. या स्पर्धेचे आयोजन सिव्हील लाईन येथील स्व. वसंतराव देशपांडे सभागृहात नुकतेच करण्यात



आले. या स्पर्धेत उपराजधानीतील विविध शाळेच्या १ हजार ४०० वर विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. अंतिम फेरीत सेंटर पॉईंटच्या पारितोष कान्हे आणि अनिरुद्ध मुरारका या विद्यार्थ्यांनी सर्वाधिक ४५ गुण प्राप्त करून प्रथम स्थान प्राप्त करीत आपल्या शाळेचा नावलौकिक वाढवला. या स्पर्धेत 'रनर अप'चा मान दिल्ली पब्लिक स्कूलचे विद्यार्थी अभिषेक आणि अबू बकर यांना मिळाला. यावेळी विजेत्यांना डॉ. आर.के. इंगळे, चैतन्य साठे या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. या स्पर्धेत सेंटर पॉईंटसह, भोसला मिलिट्री स्कूल, भवन्स, डीपीएस, स्वामीनारायण विद्यालय, बीव्हीएम स्कूल आदी शाळेच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.